RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक २१(३)] मंगळवार, ऑक्टोबर १५, २०२४/आश्विन २३, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**पृष्ठे**

**सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५.—** श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. १-३

**विधि व न्याय विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १५ ऑक्टोबर २०२४.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XV OF 2024.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND SHREE SIDDHI VINAYAK GANPATI TEMPLE TRUST (PRABHADEVI) ACT, 1980.

**सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५.**

**श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९८१ चा महा. ६. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) अध्यादेश, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ५ मधील, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १९८१ चा महा. ६.

" (३) राज्य शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, एक सभापती, एक कोषाध्यक्ष आणि पंधरापेक्षा अधिक नसतील असे इतर सदस्य यांची मिळून बनणारी एक समिती नियुक्त करील. ".

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, पोट-कलम (१) मधील, " तीन वर्षांसाठी " या मजकुराऐवजी, " पाच वर्षांसाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

शंका दूर करणे.

**४.** शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) अध्यादेश, २०२४ याद्वारे, समितीच्या सदस्यांचा पदावधी वाढविण्याच्या संबंधात केलेली सुधारणा, उक्त अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी नियुक्त केलेल्या, सभापती व कोषाध्यक्ष यांच्यासह, सर्व सदस्यांना लागू असेल. २०२४ चा महा. अध्या. १५.

## निवेदन

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० (१९८१ चा महा. ६) याच्या कलम ५ मध्ये, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन समितीची तरतूद केलेली असून ती, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) चे व्यवस्थापन पहाते. उक्त कलम ५ च्या पोट-कलम (३) मध्ये, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, एक सभापती, एक कोषाध्यक्ष आणि सातपेक्षा अधिक नसतील असे इतर सदस्य यांची मिळून होणारी एक समिती नियुक्त करण्याची तरतूद केली आहे.

कलम ७ चे पोट-कलम (१) मध्ये, सभापती व कोषाध्यक्ष यांच्यासह समितीच्या सदस्यांचा पदावधी तीन वर्षे इतका असेल अशी तरतूद केली आहे.

**२.** विश्वस्तव्यवस्थेला, भक्तांसाठी अधिक चांगल्या सुविधा पुरविणे तसेच त्यांच्या कल्याणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करणे आणि उक्त विश्वस्तव्यवस्थेचे प्रभावी व्यवस्थापन व उत्तम प्रशासन करणे शक्य व्हावे यासाठी, व्यवस्थापन समितीच्या इतर सदस्यांची एकूण संख्या नऊ वरून पंधरा इतकी वाढविणे आणि समितीच्या सदस्यांचा पदावधी, तीन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढविणे इष्ट आहे, असे वाटते.

**३.** म्हणून, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० याच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) मध्ये आणि कलम ७ च्या पोट-कलम (१) मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

**४.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १४ ऑक्टोबर २०२४.

**सी. पी. राधाकृष्णन,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुवर्णा केवले,**
शासनाचे प्रधान सचिव व विधिपरामर्शी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.